# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.11.2024** **वारःशनिवार**

---

1. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 147 व्या तुकडीच्या दिमाखदार दीक्षांत संचलन सोहळ्याला हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांच्या उपस्थितीत प्रारंभ
2. विविध मुद्यांवरून विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या सोमवारपर्यंत स्थगित
3. यंदाचा गदिमा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना जाहीर आणि
4. गोंदिया जिल्ह्यात बस अपघातात 11 जणांचा मृत्यू; मृतांच्या कुटुंबांना केंद्र आणि राज्य सरकारकडून मदतीची घोषणा

**<u>राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी- दीक्षांत</u>**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 147 व्या तुकडीचा दिमाखदार दीक्षांत संचलन सोहळा आज होत आहे. हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग या सोहळ्यासाठी उपस्थित आहेत. दरम्यान 147व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ काल पार पडला. त्यावेळी लखनौ विद्यापीठाचे कुलगुरू आलोक कुमार राय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

लष्करी सेवेत दाखल होताना पारंपरिक युद्ध कौशल्यांबरोबर नव्यानं अंतर्भूत झालेल्या आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता या गोष्टीत अवगत असणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन कुलगुरु राय यांनी केलं. युद्धाचं स्वरूप बदललं असून आता त्यामध्ये सायबर हल्ले आणि इतर गोष्टींचाही समावेश झाला आहे. या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी आपण सदैव तयार असायला हवं असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं.

दीक्षांत सोहळ्यात 359 स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विज्ञान शाखेचे 83, संगणक विज्ञान 86, कला शाखेचे 58 तर बिटेक शाखेच्या 132 छात्रांचा समावेश आहे. तर 19 परदेशी छात्र आहेत. यंदा विज्ञान शाखेसाठी युवराजसिंग चौहान, संगणक विज्ञान शाखेसाठी शशिशेखर सिंग, कला शाखेसाठी गुरुप्रीत सिंग, बीटेक साठी सिंद्धांत झाकड यांना गौरवण्यात आलं. मित्र देशातील छात्रांमध्ये महम्मद शफी अहमद हा बांगलादेशचा छात्र प्रथम आला. कार्यक्रमानंतर आपल्या भावना व्यक्त करताना छात्र सिंद्धांत झाकड म्हणाला.......

**<u>नाशिक दीक्षांत</u>**

नाशिकरोडच्या कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूल इथं विविध अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या छात्रांचा दीक्षान्त समारंभ सोहळा काल सकाळी पार पडला. वैमानिकांच्या तुकडीनं 'जय हो' या धूनवर शानदार संचलन करत वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना मानवंदना दिली. चित्ता, चेतक, ध्रुव या लढाऊ हेलिकॉप्टरच्या चित्तथरारक युद्ध प्रात्यक्षिकांनी हा सोहळा रंगला. या समारंभात नेपाळसह नायजेरिया आणि भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांसह चार महिला अधिकाऱ्यांनी हेलिकॉप्टर पायलट म्हणून पदवी प्राप्त केली. यावेळी आर्मी एव्हिएशन कॉर्प्सचे महासंचालक लेफ्टनंट जनरल व्ही. के. नांबियार यांनी मार्गदर्शन केलं.

**<u>संसद</u>**

अदानी कथित लाचखोरी प्रकरणासह इतर मुद्यांवरून विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात कालही व्यत्यय आला. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज काल चौथ्या दिवशी दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं.

**<u>सत्ता स्थापना</u>**

राज्यात सरकार स्थापनेसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी गुरुवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. सरकार स्थापनेसंदर्भात अनेक बाबींवर यावेळी चर्चा करण्यात आली. ही बैठक अतिशय सकारात्मक झाली, यानंतर मुंबईत आणखी एक बैठक होणार आहे, त्यात मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काल सातारा जिल्हातल्या दरे या आपल्या मूळगावी दाखल झाले आहेत.

**<u>गदिमा पुरस्कार</u>**

गदिमा प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर यांनी काल पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत केली. यंदाचा मानाचा गदिमा पुरस्कार अभिनेत्री आशा काळे यांना जाहीर झाला आहे. या पुरस्कारांबाबत अधिक माहिती देताना आनंद माडगूळकर म्हणाले ......

आधुनिक वाल्मिकी अशी ओळख असलेले ज्येष्ठ कवी गीतकार ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त येत्या 14 डिसेंबरला पुण्यात टिळक स्मारक मंदिर इथं होणाऱ्या गदिमा स्मृती समारंभात या पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**<u>युवा महोत्सव</u>**

केंद्र शासनाच्यावतीनं पुढच्या वर्षी 12 ते 16 जानेवारी या कालावधीत दिल्ली इथं आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवात जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंना सहभागी होता यावं, यासाठी पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केंद्र, आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीनं जिल्हास्तरावर युवा महोत्सवाचं आयोजन 5 आणि 6 जानेवारीला आझम कॅम्पस इथं करण्यात येणार आहे.

युवा महोत्सवामध्ये संकल्पना आधारीत स्पर्धा, लोकनृत्य आणि लोकगीत, कौशल्य विकासाअंतर्गत कथा लेखन, कविता, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, युवा नेत्यांसोबत संवाद आणि युथ आयकॉन या उपक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालय, युवक मंडळातील इच्छुक कलावंत, स्पर्धकांनी सहभागी होण्याचं आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केलं आहे.

**<u>युवा आदान-प्रदान-गडचिरोली</u>**

नेहरू युवा केंद्र, केंद्रीय क्रीडा मंत्रालय आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वतीनं गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी युवा आदान-प्रदान उपक्रम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत 50 आदिवासी युवकांची तुकडी काल बंगळुरूला रवाना झाली. जिल्हाधिकारी संजय दैने, केंद्रीय राखीव पोलिस दलाचे उपमहानिरीक्षक अजय कुमार शर्मा यांच्या उपस्थितीत त्यांना निरोप देण्यात आला. युवा आदान-प्रदान उपक्रमा अंतर्गत वर्षभरात 450 आदिवासी युवकांना देशातील विविध 9 ऐतिहासिक शहरांमध्ये पाठवलं जाणार आहे. आदिवासी तरुणांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारश्याची जाणीव करून देणं हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

**सवाई गंधर्व**

आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीनं दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात यंदाच्या वर्षी आपली कला सादर करणाऱ्या कलाकारांची घोषणा मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी काल पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत केली. मुकुंदनगर मधल्या महाराष्ट्रीय मंडळ क्रीडासंकुल इथं येत्या 18 ते 22 डिसेंबर या कालावधीत हा महोत्सव होणार आहे. सुप्रसिद्ध गायक राम देशपांडे, व्हायोलिन वादक डॉ. एल सुब्रमण्यम, पं. अजय चक्रबर्ती, सतार वादक पुरबायन चॅटर्जी, सरोद वादक अयान आणि अमान अली बंगश तसंच बासरी वादक राकेश चौरसिया तसंच गायिका आरती अंकलीकर टिकेकर आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री भरतनाट्यम नृत्यांगना शोभना या महोत्सवात आपली कला सादर करणार आहेत. अनेक नव्या उमेदीच्या कलाकारांना यावर्षी देखील या समारंभात सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका स्वरयोगिनी पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी त्यांच्या शिष्यांच्या सहगायनाने 70व्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाचा समारोप होईल.

**अपघात-गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यात काल सकाळी एस टीच्या शिवशाही बसला अपघात होऊन 11 जणांचा मृत्यू झाला तर 33 जण जखमी झाले. ही बस भंडाऱ्याहून गोंदियाकडे निघाली होती. सडक अर्जुनी मार्गावर बिंद्रावन टोला या गावानजीक चालकाचं नियंत्रण सुटल्याने बस उलटून हा अपघात झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी तीव्र शोक व्यक्त केला असून पंतप्रधान आपत्कालीन सहाय्य निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी 2 लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना एसटी महामंडळातर्फे प्रत्येकी 10 लाख रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे. आवश्यकता वाटल्यास जखमींना खासगी रुग्णालयात दाखल करावं, अशा सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. जखमींवर शासकीय खर्चातून मोफत उपचार करण्यात यावेत, अशी सूचनाही त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या अपघाताविषयी तीव्र शोक व्यक्त केला आहे.

**पुणे मॅरेथॉन**

38व्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनला उद्या, रविवारी पहाटे 3 वाजल्या पासून सुरुवात होणार आहे. सणस मैदानातून या स्पर्धेचा प्रारंभ होईल. पहाटे 3 वाजता मुख्य मॅरेथॉनला आणि साडेतीन वाजता अर्ध मॅरेथॉनला प्रारंभ होईल. सकाळी साडे सहा वाजल्यापासून 10 किलोमीटर, 5 किलोमीटर आणि व्हीलचेअर स्पर्धा सुरु होऊन, सकाळी साडे आठ वाजता स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ सणस मैदानात होणार आहे. विजेत्यांना पुणे महानगरपालिकेतर्फे 35 लाख रुपयांची बक्षिसं दिली जाणार आहेत. शाश्वत पर्यावरणासाठी पळा; हे यंदाचं घोषवाक्य आहे. या स्पर्धेमध्ये 12 हजारहून अधिक धावपटू धावणार असून त्यात सुमारे 80 परदेशी स्पर्धक आहेत.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थंडीचा जोर कायम आहे. मुंबईत सांताक्रूझ इथं 16 पूर्णांक 5 अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. अहिल्यानगर इथं सर्वात कमी 8 पूर्णांक 3 अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

**याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**